Issue No : 1 Val No. : 23 Feb. 2015

ISSN No. : 2320-9410

NIRRJ

# NEW INTERNATIONAL RELIABLE RESEARCH JOURNAL

Prathmesh Prakashan

Prathmesh Prakashan, Aurangabad.

- Chief Editor -
Asst. Prof. A. V. Hingmire

- Executive Editor -
Asst. Prof. L. M. Rathod

ISSN - 2320-9410

NEW INTERNATIONAL
RELIABLE RESEARCH JOURNAL

## CONTENTS

Vol-I, Issue- 23 February 2015



| Sr. No. | Title & Name of the Author(s) | Page No. |
|---|---|---|
| 1 | मराठी नाटकातील आत्मभान आलेली स्त्री<br>प्रा.डॉ.संपदा कुलकर्णी | 1 |
| 2 | आनंददायी भाषा शिक्षण<br>प्रा. डॉ. वैजनाथ रघुनाथराव गंदगे | 6 |
| 3 | छात्र अध्यापक के भावनिक बुध्दिमत्ता विकसन की अध्यापन क्षेत्र मे उपयोगिता<br>प्रा. कु. वैशाली शा. कंकाळे / डॉ. एस.टी. कोटवाणी | 8 |
| 4 | भारतीय संविधान आणि मानवी अधिकार<br>डॉ. उमाकांत राठोड | 11 |
| 5 | चीनशी स्पर्धा करण्यास भारतास योग्य वातावरण<br>मोतेवार अरविंद सुर्यकांत | 15 |
| 6 | विस्तार शिक्षणाची संकल्पना<br>प्रा.डॉ. कालिदास दिनकर फड | 18 |
| 7 | मानवी हक्क आणि महिला<br>प्रा.डॉ.झीनत अली | 22 |
| 8 | भारतातील उदारमतवादी प्रवाह : एक विचार<br>प्रा. लक्ष्मीकांत (जीवन) दिगंबरराव पा. लुंगारे | 25 |
| 9 | पुरोगामी चळवळ काळाची गरज ... ! पण ... पुन्हा तेच ....???<br>प्रा. चित्रा केशवरावजी धोंडगे | 29 |
| 10 | महाराष्ट्राची धर्मात्तीतता ही भारतीय परंपरंपतेच<br>प्रा. डॉ. चंद्रकला नारायणराव हनुमंते | 31 |
| 11 | महात्मा बसवेश्वर आणि कार्ल मार्क्स आर्थिक विचारधारा- एक दृष्टीक्षेप<br>प्रा. डॉ. विजया खुशालराव साखरे | 33 |
| 12 | स्वामी रामानंद तीर्थ यांच्या विचारांची प्रासंगिकता<br>प्रा.बाबासाहेब त्रिंबक मोताळे | 35 |
| 13 | भारत आणि चीनच्या समग्र संबंधाचा अभ्यास<br>प्रा. रामदास भिमा गांगुर्डे, | 39 |

**ORIGINAL ARTICLE**

# भारत आणि चीनच्या समग्र संबंधाचा अभ्यास

**प्रा. रामदास भिमा गांगुर्डे,**
**राज्यशास्त्र विभाग,**
**कला व वाणिज्य महाविद्यालय, दिंडोरी,**
**ता. दिंडोरी जि. नाशिक**

**प्रस्तावना :**

भारत आणि चीन आशियाखंडातील महत्वाचे राष्ट्र समजले जातात. जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेली दोन्ही राष्ट्रे आहेत. पाश्चात्य साम्राज्यातून मुक्त होऊन भारताने लोकशाही तर चीनने साम्यवादी शासन पध्दती आणि विचार प्रणालीचा स्विकार केला आहे. उभय राष्ट्रातील राजकीय आर्थिक, सांस्कृतिक व्यापारी तंत्रज्ञान शैक्षणिक क्षेत्रातील तसेच राजकीय संबंध निर्माण होणारे आशीया खंडात आणि जगाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपुर्ण समजले जातात. म्हणून प्रस्तुत विषयात भारत आणि चीनच्या समग्र अभ्यासाचे महत्व वाटते.

**अभ्यासपध्दती :**

शोध निबंध तयार करण्यासाठी संदर्भग्रंथ, अहवाल, वर्तमानपत्रे तसेच माहितीचे विश्लेषण, पध्दतीचा वापर केला आहे.

**प्रस्तुत शोध निबंधाची उद्दिष्टे :**

१. भारत चीनच्या समग्र संबंधाचा अभ्यास करणे.

२. भारत चीन संबंधावर परिणाम, प्रभाव टाकणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

३. भारत चीन सद्यस्थितीतील निर्माण होत असलेले बदलासंबंधीचे विश्लेषण करणे.

**शोध निबंधाचे गृहितके :**

१. भारत आणि चीन समग्र संबंधाचा उभय राष्ट्राच्या व्यापारी, तंत्रज्ञान, संशोधन शिक्षण आयातनिर्यात आणि राजकीय आर्थिक विकासावर परिणाम करतात.

२. भारत आणि चीन संबंध आंतरराष्ट्रीय राजकारणावर परिणाम व प्रभाव करतात.

**भारत आणि चीन समग्र संबंधाचे विश्लेषणात्मक अध्ययन :**

भारत आणि चीन संबंधाला भारताने नव्या सरकारने मान्यता दिल्यापासून सुरुवात झाली. क्रांतीनंतर चीनच्या नव्या शासनाला मान्यता देण्यात भारत पहिल्या दहा राष्ट्रात व आशिया खंडात दुसरा देश होता. त्यानंतर चीनने तिबेटवर आक्रमण केले. दलाई लामा ने भारताकडे मदत मागुन भारतात आश्रय घेतला. चीन विरुध्द संयुक्त राष्ट्राकडे तक्रार केली तेव्हांपासून उभय राष्ट्रात वैचारिक आणि राजकीय भेद आणि संघर्ष निर्माण झाले ते आजही आहेत. दोन्ही राष्ट्रांना अन्य कोणत्याही श्रीमंत राष्ट्राच्या आधीन किंवा नेतृत्व मान्य करण्याची मानसिकता तयार नव्हती. तथापि दोन्ही राष्ट्रांच्या विचारात भिन्नता ही सुरुवातीपासून

आहे. भारताचे अमेरिका, रशिया या दोन्ही राष्ट्रशक्ती गटाशी अनेकप्रसंगी मतभेद होत असले तरी त्यात कटूता झाली नाही परंतु १९४९ ते १९७१ मध्ये चीनचे अमेरिकेशी आणि १९६९ ते १९८७ या कालखंडात रशियाशी अत्यंत तीव्रतेचे मतभेद आणि तणाव निर्माण झाले होते त्यावेळी चीन भारतावर आरोप प्रत्यारोप करुन भारत श्रीमंत पाश्चात्य राष्ट्रांचा हस्तगत आहे असे म्हणत असे. तेव्हांपासून भारत आणि चीन संबंधात तणाव आणि संघर्ष वाढत गेले. भारत प्रथमपासूनच चीन संबंधी सावधगिरीने आपल्या राष्ट्रहिताचा, शांततेचा आणि विकासाच्या दृष्टिने युध्द संघर्ष टाळून तणाव करण्याची भूमिका घेत आला आहे. नेहरू सरकारला वल्लभभाई पटेलांनी सल्ला दिला तो असा चीनबरोबर भारताने संबंध स्थापन करतांना पुर्णपणे सावधगिरी बाळगावी. चीन आणि भारतातील संबंधावर अनेक घटक प्रभाव व परिणाम करणारे आहेत.

**तिबेट प्रश्न :**

ब्रिटीश कालखंडातच तिबेट प्रश्नांवरुन भारत आणि चीन संबंध आला आहे. तिबेट सिक्कीम आक्रमण आणि सीमा निश्चित करतेवेळी सिक्कीमला भारताच्या संरक्षणाअंतर्गतचा प्रदेश म्हणून उभय राष्ट्रांनी मान्यता दिलेली होती. भारत, तिबेट संबंधात चीन मध्यस्थ न ठेवता भारताला तिबेटशी प्रत्यक्ष संबंध ठेवु शकतो असे स्पष्ट केले होते. रशियाचा तिबेटमध्ये प्रभाव नको म्हणून इंग्लंड, चीन, धडपड करत होते. चीनने संशयाने तिबेटवर आक्रमण केले त्यावेळी दलाईलामा आणि त्यांची प्रजा भारताकडुन संरक्षण व आश्रय मिळविल्याच्या रागावरुन चीनने भारतावर आक्रमण केले. भारताच्या भूमीवर घुसखोरी करु लागल्याने उभय राष्ट्रात तणावाचे संबध वाढले.

**अरुणाचल प्रदेश :**

लढा आणि नेफा प्रदेश या भारतीय प्रदेशात चीनने वारंवार ताबा घेण्यासाठी सशस्त्र सैनिकी कारवाया नेहमीच केल्याने भारताच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला. यातून सिमा प्रश्न पुढे आला. उभय राष्ट्रात युध्द झाल्यानंतर भारताने चीन बरोबरचे सर्व प्रकारचे संबंध तोडून चीनचा निषेध केला.

**सीमाप्रश्न :**

भारत चीन वादाचा महत्वाचा मुद्या व संबंधावर परिणाम करणारा महत्वाचा घटक तो म्हणजे सीमा रेषा होय. उभय राज्यात ढोबळ मानाने आणि नकाशावर आधारित सिमारेषा मांडल्या गेल्या होत्या. परंतु चीनला ते मान्य झाले नाही त्यामुळे भारत आणि चीनमध्ये वारंवार संघर्ष वाढतच राहिले त्यावर उभय राष्ट्रात चर्चा समझोता होत राहीला. त्यातुनच आजप्रत्यक्ष पाहणी आणि निरीक्षण करुन हा प्रश्न सोडविण्याचा पर्याय उभय राष्ट्रांनी मान्य करण्याचे ठरवले. भारताच्या या म्हणण्याला चीन विरोधी रशिया, अमेरीकेचे समर्थन भारताच्या बाजूने मिळत राहीले. भारत अमेरिका, भारत रशिया मैत्रीचे संबंध तयार होत असतांना आणि पाकिस्तानच्या आत्मधातकी प्रसंगाला सामोरे जातांना उभय राष्ट्रातील संबंधात तणाव वाढत गेले. चीनने पाकिस्तानला अप्रत्यक्षात चेतावनी देवुन भारताच्या विरोधात लष्करी कारवाया करण्यास उत्तेजन दिले. या प्रकरणावरुन उभय राष्ट्रातील संबंध अधिक ताणले जात आहेत.

**भारत चीनचे आजचे संबंध :**

उभय राष्ट्रांचे संबंधात सुधारणा व्हावी, संघर्ष युध्दापेक्षा समजोता सामंजस्याने समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी पंचशील करार पाळण्याचे ठरविले. उभय राष्ट्रात विकासासाठी शांततेकरिता सिमा प्रश्न लडाख, नेफा प्रदेश चर्चेने सोडविण्यासाठी सकारात्मक प्रयत्न सन २००६ पासून तो आजपावेतो संयुक्त चर्चा गटाने या प्रश्नाकडे बघितले आहे. सन २००७-२०१० या कालखंडात भारताचे प्रधानमंत्री चीन दौरा करुन तर

ISSN - 2320-9410

चीनचे प्रधानमंत्र्यांनी भारत दौरा करुन राजकीय सामंजस्य मैत्री सिमाप्रश्नी एकूण चर्चेच्या ११ फेऱ्या पुर्ण केल्या.

**व्यापारी उत्पादन :**

भारत चीन यात व्यापारी उलाढाली संबंधी सन २०१० पर्यंत ६० अब्ज डॉलरपर्यंत उलाढाल पोहचविणे चीनच्या दृष्टीने चीनच्या मालास जगातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणजे भारत. भारताच्या अर्थव्यवस्थेला नेहमीच खच्ची करण्याचा चीनने मार्ग कधीच सोडला नाही. भारत चीनशी स्पर्धा करुन पुढे जात आहे हे चीनला कायम बोचते. म्हणून चीन आणि भारत यांच्या व्यापारी संबंध दृढ व्हावेत असे भारताला प्रामणिक वाटते.

**संरक्षण दृष्टिने :**

उभय राष्ट्रांमध्ये आज संरक्षणाच्या हेतूने अभियांत्रिकी शिक्षण वित्तीय सेवा माहिती तंत्रज्ञान. वाहतूक, पर्यटन, अनुतंत्रज्ञान, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात संयुक्तपणे सहकार्य करण्याचे करार झाल्याचे दिसते. संरक्षणाच्या दृष्टिने लष्कराच्या संयुक्त कवायती करण्याचे करार उभय राष्ट्रात झाले आहेत. यातून उभय राष्ट्रात तणाव वजा सहकार्य मैत्रीचे संबंध निर्माण होतील अशी अपेक्षा करुन भारताचा नेहमी आपल्या शेजारील राष्ट्राच्या दृष्टिने सामंजस्य सहकार्य दृष्टिकोन असून चीनच्या बाबतीतही चीन आपला शत्रू नसून एक सहभागीदार देश समजला जातो. चीनला अमेरिका, रशिया, या राष्ट्रांनी भारताशी केलेले वेगवेगळे क्षेत्रातील करार आणि गुंतवणुक हे नेहमीच घृणास्पद वाटत असल्याने भारत आणि चीन या उभय राष्ट्रात आज कधी मैत्री तर कधी मधुनच तणाव संबंध निर्माण झाल्याचे आढळून येतात.

यावरुन उभय राष्ट्रातील सहकार्य मैत्री संबंध भविष्यात सुधारण्यासाठी बरेच बदल झाल्याचे निदर्शनास आल्याने उभय राष्ट्रात चांगले संबंध तयार होतील असे वाटते.

**संदर्भ :**

१. भारताची विदेश निती - डॉ. चंद्रशेखर दिवाणी
२. आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण : प्रा.र.ब. बराडकर
३. आंतरराष्ट्रीय संबंध - प्रा. प्रेम अरोरा
४. International politics - Prakash Chandra
५. आंतरराष्ट्रीय संबंध - डॉ. रयपूरकर वसंत
६. दैनिक सकाळ, दै. लोकसत्ता, लोकमत, महाराष्ट्र टाईम्स इ.